श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-६, अंक-१२ | डिसेंबर-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४ |

## पेन मॅनेजमेंट अर्थात वेदना-निवारण व्यवस्थापन

भ.क.ल.वालावलकर रुग्णालय, श्रीक्षेत्र डेरवण येथे पेन मॅनेजमेंट अर्थात वेदना-निवारण व्यवस्थापन कक्षाची सुरुवात झाली आहे. या कक्षात डॉ. केतकी पाठक-परांजपे रुग्ण तपासतील. डॉ. केतकी पाठक-परांजपे या भूलशास्त्र विषयात पारंगत असून त्यांनी 'पेन व पॅलिएटिव्ह केअर मॅनेजमेंट' या विषयातही शिक्षण घेतलेले आहे. वेदनेचे निदान, गुडघेदुखी, पाठदुखी, अर्धांगवायूनंतर येणारी सूज व वेदना निवारण, डोकेदुखी, अर्धशिशी, कॅन्सर, ओटीपोटाचे दुखणे, इजा झाल्यानंतरचे दुखणे या व अशा अनेक दुखण्यांवर डॉ. केतकी पाठक-परांजपे दीर्घकाळ इलाज करीत आहेत. या सर्व दुखण्यांसाठी औषधे, व्यायाम, समतोल तपासणी, इंजेक्शन्स याद्वारे उपचार करण्यात येतात. तसेच कॅन्सर रुग्णांच्या सर्व समस्यांचे निवारण करण्याचा त्यांना सखोल अनुभव आहे.

**'पेन मॅनेजमेंट व पॅलिएटिव्ह केअर ओ.पी.डी.' प्रत्येक मंगळवार ते रविवार सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत सुरू राहील.** मात्र इंजेक्शनचा उपचार असेल तर रुग्णाला एक दिवस रुग्णालयात दाखल होणे आवश्यक असते. ज्यांना वेदना निवारण उपचारांची आवश्यकता आहे त्यांनी या बाह्यरुग्ण विभागाशी संपर्क साधावा आणि वेदनामुक्त जीवनाचा आनंद अनुभवावा कारण 'देही आरोग्य नांदते । भाग्य नाही त्या परते ।।'



*डॉ. केतकी पाठक-परांजपे : रुग्णतपासणी करताना*

# नर्सिंग उच्च शिक्षणाची सुविधा

कोकणातील मुली शिकाव्यात, स्वावलंबी व्हाव्यात आणि आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित परिचारिका उपलब्ध व्हाव्यात यासाठी 'भ.क.ल. वालावलकर रुग्णालय रोगनिदान व संशोधन केंद्र', श्रीक्षेत्र डेरवण येथे सन २०००पासून नर्सिंग शिक्षणाची सोय करण्यात आली. १० मुलींना 'ए.एन.एम.' या अभ्यासक्रमासाठी प्रवेश देऊन नर्सिंग कॉलेज सुरू झाले. त्यानंतर टप्प्याटप्प्याने वाढ होत 'जी.एन.एम.', 'पी.बी. बी.एस्सी. नर्सिंग' हे अभ्यासक्रम सुरू झाले. नर्सिंग शिक्षणातील पुढील पायरी म्हणजे 'एम. एस्सी. नर्सिंग' कोर्स.

या अभ्यासक्रमात एकूण पाच शाखा आहेत. त्यातील 'Medical Surgical Oncology' व 'Obstetric Gynaecology' या दोन शाखांच्या अभ्यासक्रमासाठी 'श्रीविठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'च्या 'समर्थ नर्सिंग स्कूल' या शिक्षण संस्थेला परवानगी मिळाली आहे. हे दोनही अभ्यासक्रम 'महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ' व महाराष्ट्र शासनाचे 'महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय महामंडळ' या दोन्ही संस्थांचे मान्यताप्राप्त अभ्यासक्रम आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी चार विद्यार्थ्यांना प्रवेश मान्यता मिळाली आहे. या दोन्ही अभ्यासक्रमांचा कालावधी दोन वर्षांचा असून शैक्षणिक पात्रता पुढीलप्रमाणे आहे–

१) 'बेसिक बी.एस्सी. नर्सिंग' हा चार वर्षांचा कोर्स झाल्यानंतर एक वर्षाचा नर्सिंगचा अनुभव, किंवा –

२) 'पोस्ट बेसिक बी.एस्सी. नर्सिंग' हा दोन वर्षाचा कोर्स झालेला असावा.

हे दोन्ही कोर्सेस नोव्हेंबर २०१८पासून सुरू झाले आहेत. या कोर्सेसचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी रुग्णालये व नर्सिंग शिक्षणक्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत.



*नर्सिंग कॉलेजची भव्य इमारत*

# डेरवण येथील क्रीडासंकुलात विभागस्तरीय शालेय मल्लखांब तसेच डॉजबॉल स्पर्धा

दिनांक ०८ व ०९ ऑक्टोबर २०१८ रोजी डेरवण येथील क्रीडासंकुलात शालेय विभागस्तरीय मल्लखांब स्पर्धेचे आणि दिनांक १० व ११ ऑक्टोबर २०१८ रोजी शालेय विभागस्तरीय डॉजबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये रत्नागिरी, सांगली, सातारा ग्रामीण, सिंधुदुर्ग, कोल्हापूर ग्रामीण येथील खेळाडूंनी सहभाग नोंदविला. मल्लखांब स्पर्धेत एकूण १८६ खेळाडूंनी तसेच डॉजबॉल स्पर्धेत एकूण २५४ खेळाडूंनी भाग घेतला. या डॉजबॉल स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचा संघ नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत कोल्हापूर विभागाचे प्रतिनिधीत्व करील.




*विभागस्तरीय शालेय मल्लखांब शिबिर – उद्घाटन समारंभ*

# क्रीडासंकुलात हिवाळी क्रीडा शिबिरांचे यशस्वी आयोजन

दिनांक १६, १७ आणि १८ नोव्हेंबर २०१८ रोजी क्रीडासंकुलात हिवाळी फुटबॉल शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरास के. एन. एफ. सी. (कपाडिया नगर फुटबॉल क्लब, पनवेल शाखा) येथील एकूण ३५ खेळाडूंचा समावेश होता. सहभागी खेळाडूंनी शिबिरादरम्यान प्रशिक्षक काका परांजपे यांच्याकडून फुटबॉल खेळाचे धडे घेतलेच पण त्याचबरोबर संकुलातील शूटिंग, स्विमिंग, आर्चरी या खेळांचाही आस्वाद घेतला व वॉल क्लाइम्बिंग, बर्मा ब्रिज या साहसी खेळांचाही मनमुराद आनंद घेतला. येथील दर्जेदार क्रीडा सुविधांमुळे शिबिर अविस्मरणीय ठरल्याचे मनोगत खेळाडू, पालक व प्रशिक्षक यांनी व्यक्त केले. याचबरोबर दिनांक १० नोव्हेंबर ते दिनांक १२ नोव्हेंबर २०१८ या कालावधीत कोकण फुटबॉल असोसिएशन मार्फत १० ते १५ वर्ष वयोगटातील मुलांसाठी फुटबॉल प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराला रत्नागिरी, दापोली, खेड, सावर्डे आणि चिपळूण येथील खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यामध्ये एकूण ४३ खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

रत्नागिरी जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 'ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशन'च्या प्रमाणपत्रधारक प्रशिक्षकांनी तसेच 'स्पोर्को फुटबॉल असोसिएशन'चे संचालक सिद्धार्थ सभापती व प्रशिक्षक आनंद साने यांनी खेळाडूंना तंत्रशुद्ध मार्गदर्शन केले व चित्रफितीच्या साहाय्याने स्पर्धेदरम्यान आवश्यक असणाऱ्या व्यूहरचनांची देखील माहिती दिली.

# 'एसव्हीजेसीटी' क्रीडासंकुलातील धनुर्धरांची नागपूर येथे सोनेरी कामगिरी

नागपूर येथे दिनांक १० नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०१८ या काळात 'महाराष्ट्र आर्चरी असोसिएशन' आणि 'नागपूर जिल्हा आर्चरी असोसिएशन' मार्फत पहिल्या 'स्फूर्ती इन्व्हिटेशनल नॅशनल चॅम्पियनशिप' या राष्ट्रीय स्पर्धेचे तसेच सतराव्या राज्यस्तरीय 'सब-ज्युनियर चॅम्पियनशिप' स्पर्धेचे संयुक्त आयोजन करण्यात आले. या दोन्हीही स्पर्धेमध्ये 'एसव्हीजेसीटी' क्रीडासंकुलातील धनुर्धर खेळाडूंनी पदकांची लूट केली. सब ज्युनियर राज्यस्तरीय स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंची राष्ट्रीय संघात निवड झालेली असून ते महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करतील. यामध्ये 'एसव्हीजेसीटी' क्रीडासंकुलातील खेळाडू ईशा पवार हिने प्रथम क्रमांक मिळवीत संघात आपले स्थान निश्चित केले. या दोन्ही स्पर्धेत संकुलातील खेळाडूंनी ३ सुवर्ण, ५ रौप्य व ३ कांस्यपदकांसह एकूण ११ पदकांची लूट केली.

'स्फूर्ती इन्व्हिटेशनल नॅशनल चॅम्पियनशिप' स्पर्धेत 'कंपाउंड राउंड' प्रकारात ईशा पवार, मृणाल सकपाळ आणि रिया पाकळे यांनी अनुक्रमे सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदक जिंकले तर सिद्धी साळुंखे हिला 'रिकर्व्ह राउंड'मध्ये कांस्य आणि शेजल चव्हाण हिला 'इंडियन राउंड'मध्ये कांस्यपदक मिळाले.

१७ व्या राज्यस्तरीय 'सब-ज्युनियर चॅम्पियनशिप' स्पर्धेत ईशा पवार हिला 'रँकिंग राउंड' आणि 'एलिमिनेशन राउंड'मध्ये सुवर्णपदक मिळाले तर मृणाल सकपाळ, रिया पाकळे आणि रूपल पटेल यांना 'कंपाउंड राउंड'मध्ये सांघिक रौप्यपदक मिळाले.




*आपली पदके अभिमानाने दाखविताना (डावीकडून)- रूपल पटेल, सिद्धी साळुंखे, मृणाल सकपाळ, प्रशिक्षक ओंकार घाडगे, रिया पाकळे, ईशा पवार आणि सेजल चव्हाण*

# क्रीडासंकुलातील खेळाडू वर्ल्ड चॅम्पियनशिप निवड चाचणीला रवाना

क्रीडासंकुलातील धनुर्विद्या (आर्चरी) खेळातील राष्ट्रीय खेळाडू ईशा पवार, रिया पाकळे आणि मृणाल सकपाळ या दिनांक २४ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०१८ रोजी सोनीपत, दिल्ली येथे होणाऱ्या वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी पात्र ठरल्या आहेत. या स्पर्धेतील विजेते खेळाडू माद्रिद, स्पेन येथे होणाऱ्या यूथ वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करतील.

'एसव्हीजेसिटी' टिमला हार्दिक शुभेच्छा!

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com




*खास कोकणातील मुलांसाठी कोकणातील सर्वोत्कृष्ट मैदानावर पहिले फुटबॉल-मार्गदर्शनपर शिबिर*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून डिसेंबर २०१८ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०१ डिसेंबर | डॉ. भारती खांडेकर, मुंबई (प्लॅस्टिक सर्जन) | दुभंगलेले टाळू व ओठ शस्त्रक्रिया |
| ८ व ९ डिसेंबर | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| ०९ डिसेंबर | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| ०९ डिसेंबर | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | मूत्रपिंड विकार |
| १५ डिसेंबर | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (सर्जन ) | भाजलेले व्रण, डाग- शस्त्रक्रिया व उपचार |
| १५ डिसेंबर | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| १५ डिसेंबर | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| १५ डिसेंबर | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक) | त्वचारोग तज्ज्ञ<br>सकाळी १०.०० ते १.०० वालावलकर रुग्णालयात.<br>सायंकाळी ५.०० ते ८.०० UHTC चिपळूण येथे |
| १६ डिसेंबर | डॉ. के. मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाचे उपचार |
| २३ डिसेंबर | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट) | पोटाचे विकार |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
**प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या शनिवारी 'वाचा-उच्चार तज्ज्ञ' डॉ. विशाखा या वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**वालावलकर रुग्णालय येथे, RHTC व वालावलकर रुग्णालय यांचे संयुक्त डोहाळेजेवण व सासू-सून मेळावा - २८ डिसेंबर**
**सहा महिन्यांच्या मुलांचे वाढदिवस -** २७ डिसेंबर । **सरपंच मेळावा -** २२ डिसेंबर

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर